# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( विद्या विभाग )**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली —४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

गोविग/विद्या/क्र./११२/२०२०  दि १८/०२/२०२०

## परिपत्रक

विद्यापीठा अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या सर्व तदर्थ अभ्यासमंडळाच्या सदस्यांना सुचित करण्यात येते की, दि. ०१/०२/२०२० रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या सभेतील बाब क्र. २ अन्वये अभ्यासमंडळाच्या नियमित वार्षिक सभा, २०२० मध्ये होणाऱ्या नियमित अभ्यासमंडळाच्या सभेत मा. अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली तदर्थ अभ्यासमंडळ अध्यक्षांची नियुक्ती खालील अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.

१) कलम ४० (२) (घ) प्रमाणे गठीत झालेल्या अभ्यासमंडळाच्या सदस्यापैकी एक अध्यक्ष म्हणुन निवड करावा.

२) कलम ४० (२) (घ) मधील (क),(ख), (ग), (घ), (ङ) व (च) अहर्ता अटी नमूद केलेल्या आहे.

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा,

(ख) एकूण किमान पंधरा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,

(ग) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,

(घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,

(ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावे,

(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

वरीलप्रमाणे अभ्यास मंडळाच्या बैठकीत ज्या सदस्याचे अधिकतम अटी प्राप्त असेल अशा सदस्याला तदर्थ अध्यक्ष म्हणुन निवड करावी.

३) वरीलप्रमाणे जर अभ्यास मंडळाच्या सदस्यापैकी एक पेक्षा अधिक सदस्य जर वरील प्रमाणे अहर्ता पुर्ण करत असेल तर ज्या सदस्याची शैक्षणिक सेवाजेष्ठता/पद जेष्ठता जास्त असेल त्यास तदर्थ अध्यक्ष म्हणून निवड करण्यात यावी.

४) शैक्षणिक सेवाजेष्ठता/ पद जेष्ठता यापैकी पदजेष्ठतेला प्राधान्य द्यावे.

५) अभ्यास मंडळाच्या तदर्थ अध्यक्षाला विद्यापरिषदेच्या सभेकरीता गरजेप्रमाणे आंमत्रित सदस्य म्हणुन बोलविण्यात यावे.

६) अभ्यासमंडळाच्या तदर्थ अध्यक्षाच्या कालावधी अधिकतम २ वर्षाचा असेल.

सर्व सन्माननीय तदर्थ अभ्यासमंडळाच्या सदस्यांनी आयोजीत होणाऱ्या सभेला येतांना सोबत बायोडाटा घेवून यावे, याची सर्व सबधितांनी नोंद घ्यावी.

सधन्यवाद!

**मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये,**

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
कुलसचिव